Nagpur Shikshan Mandal's

**SHRIMATI BINZANI MAHILA MAHAVIDYALAYA**

**MAHAL, NAGPUR**

**NAAC Re-Accredited B Grade**

## श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थीचा सत्कार

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय महाल येथे नुकताच महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षेत ठरलेल्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थीचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार यांनी केले. "कलाक्षेत्रातील विद्यार्थीना देखील लवकरच नव्या क्षेत्रातील संधी उपलब्ध होतील" असे मनोगत यावेळी त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करणारी कु. अंजली किरण चव्हाण 86.17 गुण मिळवून सत्कारास पात्र ठरली द्वितीय क्रमांक कु. तन्वी मोहरील हिने 83.50 टक्के गुण तर अनुक्रमे फातिमा झिनत मगसुद शेख 78.1 तर सना मगसुद शेख 76.5 या गुणांसह महाविद्यालयात यशस्वी ठरल्या आहेत. महाविद्यालयाचा निकाल 95% लागलेला असून विद्यार्थिनींनी उत्तम यश प्राप्त केले आहे. याप्रसंगी छात्रप्रोत्साहन निधीचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यापीठ परीक्षेत चतुर्थ स्थानावर यशस्वी ठरलेल्या कु. राधा मुकुंद देशकर हिचा देखील या प्रसंगी सत्कार करण्यात आला. आपल्या या यशाचे श्रेय विद्यार्थिनींनी आपले आईवडील व गुरुजन यांना दिले आहे. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. सुचेता मराठे, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरडे समस्त प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व आभारप्रदर्शन डॉ. गायत्री ताजणे यांनी केले.